**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==========================================================

जावक क्रमांक – ५४९९ /८५ दिनांक :- २८ डिसेंबर, २०२३

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडातर्फे मास्टर लिस्टवरील २६५ पात्र भाडेकरू-रहिवाशांची संगणकीय सोडत उत्साहात

## ऐतिहासिक निर्णयामुळे बृहतसूचीवरील सदनिका वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान

मुंबई, २८ डिसेंबर, २०२३ :- म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील बृहतसूचीवरील (मास्टर लिस्ट) जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील २६५ पात्र भाडेकरू-रहिवाशी यांना सदनिकांचे वितरण करण्यासाठी मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते आज पहिल्यांदा संगणकीय सोडत काढण्यात आली.

वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमावेळी श्री. शंभरकर म्हणाले की, या ऐतिहासिक निर्णयामुळे बृहतसूचीवरील सदनिका वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान झाली असून सदनिका वितरणाच्या प्रक्रियेत सुसूत्रता येणार असून भाडेकरू/रहिवाशी यांच्या तक्रारी कमी होण्यास मदत होणार असल्याचे श्री. शंभरकर यांनी सांगितले. बृहतसूचीवरील (मास्टर लिस्ट) जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरू/रहिवाशी यांना पहिल्यांदाच इतक्या मोठ्या संख्येने एकाच वेळी सदनिकांचे वितरण संगणकीय सोडतीद्वारे होत असून वर्षानुवर्षे संक्रमण गाळयात राहणाऱ्या भाडेकरू/रहिवाशी यांना मुंबईच्या हृदयस्थानी आपले हक्काचे घर मिळाले असून यात आनंद असल्याचे श्री. शंभरकर म्हणाले. म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार, मार्गदर्शनाखाली व संकल्पनेनुसार जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील पात्र भाडेकरू / रहिवाशी यांना बृहतसूचीवरून सदनिका वितरण करण्यासाठीची नियमावली निश्चित करण्यात आली आहे. त्यासंदर्भातील परिपत्रक दि. २२ डिसेंबर, २०२३ रोजी जारी करण्यात आले. बृहतसूचीवरून भाडेकरू / रहिवाशी यांना सदनिका वितरणाच्या धोरणाचा भाग म्हणून यापूर्वीचे प्राधिकरणाचे ठराव, परिपत्रके, आदेश रद्द, अधिक्रमित, सुधारित करून त्यामध्ये बदल करण्यात आला आहे. नवीन नियमावलीनुसार निवासी गाळा वितरणाची मर्यादा निश्चित करण्यात आली असून निवासी गाळयांचे वितरण संगणकीय प्रणालीने करण्याचा निर्णय घेऊन त्याची तात्काळ अंमलबजावणी केली जात असल्याचे श्री. शंभरकर म्हणाले.

एकूण उपलब्ध ४४४ सदनिकांसाठी बृहतसूचीवरील पात्र २६५ भाडेकरू/ रहिवाशी यांच्यासाठी आज संगणकीय सोडत काढण्यात आली. बृहतसूचीवरील पात्र भाडेकरू/ रहिवाशी यांना सदनिका वितरित करण्यासाठी ठरविण्यात आलेल्या निकषानुसार ३०० चौरस फूटापेक्षा कमी क्षेत्रफळाच्या जुन्या

सदनिकाधारक १८ पात्र भाडेकरू/ रहिवाशी यांना त्यांच्या मागणीनुसार ४५० चौरस फूट वाढीव क्षेत्रफळाची सदनिका देण्यात आली.

३०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारक ५२ पात्र भाडेकरू/ रहिवाशी यांना त्यांच्या विनंतीनुसार ३०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका विनामूल्य वितरित करण्यात आली.

३०० चौरस फूट क्षेत्रफळापेक्षा कमी आकारमानाच्या १७२ जुन्या पात्र भाडेकरू/ रहिवाशी यांना ३०१ ते ४०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित करण्यात आली. ३०१ ते ४०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या १० जुन्या पात्र भाडेकरू/ रहिवाशी यांना ४०१ ते ५०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित करण्यात आली. ४०१ ते ५०० चौरस फुट क्षेत्रफळाच्या ०५ जुन्या सदनिकाधारक पात्र भाडेकरू/ रहिवाशी यांना ५०० ते ६०० चौरस फुट क्षेत्रफळाची सदनिका वितरित करण्यात आली. ५०१ ते ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या ०५ जुन्या पात्र भाडेकरू/ रहिवाशी यांना ६०१ ते ७०० चौरस फुट क्षेत्रफळाची सदनिका वितरित करण्यात आली. ६०१ ते ७५३ चौरस फूट क्षेत्रफळापेक्षा अधिक आकारमानाच्या ०७ पात्र भाडेकरू/ रहिवाशी यांना दि. २२ डिसेंबर २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार ७५३ चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित करण्यात आली.

यावेळी मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता श्री. सुनील जाधव, मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे, उपमुख्य अधिकारी श्री. अनिल वानखेडे, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ, 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर, उपमुख्य अधिकारी श्रीमती विराज मढावी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके आदी उपस्थित होते.

सदर परिपत्रकानुसार ज्या पात्र भाडेकरू/रहिवाशी यांना ३०० चौरस फुटापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या सदनिकांचे वाढीव शुल्क भरणे शक्य आहे, अशा अर्जदारांसाठी उपरोक्त नमूद परिपत्रकात विशेष तरतूद करण्यात आली आहे. विशेष तरतुदीनुसार ज्या पात्र भाडेकरू /रहिवाशी यांना ३०० चौरस फुटापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या सदनिकांचे वाढीव शुल्क भरणे शक्य नाही, अशा अर्जदारांनी म्हाडाकडे तसा विनंती अर्ज सादर करावा. अर्जदारांची निष्काषन सूचना दिनांकानुसार ज्येष्ठता यादी तयार करून उपलब्ध गाळयांच्या प्रमाणात सोडत पद्धतीने ३०० चौरस फूट गाळयांचे वितरण विनाशुल्क करण्यात येणार आहे.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकरप्राप्त इमारतीमधील ज्या भाडेकरू/ रहिवाशी यांना निष्कासन सूचना (व्हेकेशन नोटीस) देऊन इमारत खाली करण्यात आली आहे व त्यांच्या मूळ इमारतीचा अरुंद भूखंड, आरक्षण, रस्ता रुंदीकरण या कारणामुळे पुनर्विकास शक्य नाही. तसेच उपकरप्राप्त इमारती पुनर्रचित झाल्या आहेत, मात्र कमी गाळे बांधले गेले आहेत अशा वंचित मूळ भाडेकरू/ रहिवाशी यांना यापूर्वी मंडळाद्वारे पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीमध्ये कायमस्वरूपी गाळा देण्यात आलेला नाही व त्यांचे वारसदार संक्रमण शिबिरात किंवा इतर ठिकाणी राहत आहेत अशा बृहतसूचीवरील २६५ पात्र मूळ भाडेकरू / रहिवाशी अथवा त्यांचे वारसदार यांची आज संगणकीय सोडत काढण्यात आली.

दि. २२ डिसेंबर, २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार निश्चित नियमावलीनुसार बृहतसूचीवरील भाडेकरू/रहिवाशांकडून आलेल्या अर्जावर, दावे/हरकतीवर निर्णय घेऊन वितरण यादी अंतिम करण्यासाठी पाच सदस्यीय समिति गठित करण्यात आली आहे. समितीने आदेश दिल्यानंतर हरकती व सूचनांकरिता सात दिवसांच्या कालावधीकरिता म्हाडाच्या संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. बृहतसूची समितीने अर्जदारांची पात्रता सिद्ध केल्यानंतर निष्कासन सुचनेच्या दिनांकाच्या ज्येष्ठतेप्रमाणे यादी तयार करण्यात येणार आहे. बृहतसूची समितीच्या सुनावणीचा निर्णय म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाणार आहेत.

विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्रांद्वारे उपलब्ध करून दिलेल्या सदनिकांची यादी बृहतसूचीवरील भाडेकरू / रहिवाशी यांना वितरणासाठी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

संगणकीय सोडतीसाठी सदनिकांच्या उपलब्धतेनुसार पात्र अर्जदारांची संख्या त्यांच्या निष्कासन सुचनेच्या तारखेच्या ज्येष्ठतेनुसार निश्चित करण्यात येणार आहे. भाडेकरू / रहिवाशी यांची पात्रता निष्कासन सूचनेच्या आधारे निश्चित झाल्यानंतर सोडतीत सदनिका विजेता घोषित झाल्यावर अर्जदाराने सदनिका नाकारल्यास अर्जदारास सदनिका घेण्यात स्वारस्य नसल्याचे मानून त्याचा बृहतसूचीवरील हक्क संपुष्टात येणार आहे. संगणकीय सोडतीनंतर अर्जदाराने १५ कार्यालयीन दिवसांच्या आत उपमुख्य अधिकारी, पुनर्रचित गाळे विभाग यांच्याकडे स्वीकृती पत्र सादर करणे गरजेचे आहे. सदर स्वीकृती पत्र १५ दिवसांच्या आत सादर न झाल्यास भाडेकरू / रहिवाशी यांना या सदनिकमध्ये स्वारस्य नसल्याचे गृहीत धरून बृहतसूचीवरील हक्क संपुष्टात येणार आहे.

अर्जदाराने देकारपत्र प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवसांच्या आत देकारपत्रातील नमूद अटी व शर्तींची पूर्तता करून ताबा घेणे बंधनकारक असून तसे न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदनिकेचे वितरण रद्द होणार असून बृहतसूचीवरील हक्क संपुष्टात येणार आहे.

बृहतसूचीवरील पात्र अर्जदारांना सदनिका वितरित करण्यासाठी निकष ठरविण्यात आले असून ३०० चौरस फूटापेक्षा कमी क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ३०० ते ४०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. ३०१ ते ४०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ४०० ते ५०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. ४०१ ते ५०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ५०० ते ६०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. ५०१ ते ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ६०० ते ७०० चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. ६०१ ते ७०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जुन्या सदनिकाधारकाला ७०० ते ७५३ चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका वितरित केली जाणार आहे. तसेच ७०१ व त्यावरील जुन्या सदनिकाधारकाला ७५३ चौरस फूट क्षेत्रफळापर्यंत सदनिका वितरित केली जाणार आहे. गाळे वाटपाच्या धोरणात बदल करण्यात आला असून नवीन धोरणानुसार मूळ गाळयाच्या क्षेत्रफळापेक्षा अतिरिक्त क्षेत्रफळाचा गाळा लाभार्थ्यांना देण्याची तरतूद आहे. मूळ गाळा निशुल्क असून अतिरिक्त क्षेत्रफळाकरिता चालू आर्थिक वर्षाच्या रेडिरेकनर दराच्या १२५ टक्के दराने अधिमूल्याची आकारणी करून वितरित करण्यात येणार असल्याचे परिपत्रकात नमूद आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

MHADA - Public Relations Department

Press Release

# MHADA successfully Conducts Lottery of 265 eligible applicants on the Master list for the first time

The historical decision would bring in transparency in the tenements allocation process of Master list

Mumbai, December 28, 2023:- MHADA's Mumbai Buildings Repairs and Reconstruction Board (MBRRB) today successfully conducted first-ever computerised lottery draw and allotted 265 tenements to the eligible applicants of the master list at a function held at MHADA headquarters today.

Speaking on the occasion Mr. Milind Shambharkar, Chief Officer of (MBRRB), who inaugurated the lottery process by clicking the first draw, said that the decision to allot the tenements to the eligible applicants of the Master list through computerised lottery, was a welcome move. He further exuded confidence that this lottery process would soon put an end to the long wait by the original tenant/occupants of MBRRB. Mr. Shambharkar further said that the process of allotment of tenements through computerised lottery is definitely efficient, transparent and would win the trust of the masses. Once streamlined, would reduce the complaints by the tenants/occupants thereby gain the trust of the masses. Mr. Shambharkar further lauded the contributions of Mr. Sanjeev Jaiswal, Vice president and CEO MHADA in making the event a great success and thereby establishing the system that would relieve the tenants/occupants staying in the transit camp since years. It may be recalled that on the insistence and the directives of Mr. Jaiswal, the policy has been framed on December 22, 2023. According the new policy the tenants/occupants of the old and dilapidated cessed buildings under the jurisdiction

of MBRRB, who have been given eviction notices and redevelopment of their original building is not possible due to narrow plot, reservation, road widening have been issued to the tenants and occupants are on the masterlist, such tenants/occupants or their legal heirs will be allotted tenements through computerised lottery. The eligibility will be fixed by the five member committee. The number of eligible applicants will be determined based on their seniority as on the date of eviction notice as per availability of tenements for computerised lottery. As per the criteria fixed in the policy, the 265 eligible tenants/occupants were allotted new tenements today.

Chief Officer of Mumbai Board Shri Milind Borikar, MHADA Chief Engineers Shri. Dhirajkumar Pandirkar, Shri Sunil Jadhav and Shri. Shivkumar Aade and Secretary Shri Rajkumar Sagar, Deputy Chief Executive Officer Shri Anil Wankhede, Chief Public Relations Officer Mrs. Vaishali Gadpale, ICT Chief Smt Savita Bodake, Joint Chief officer Shri Umesh Wagh and Deputy chief officer smt Viraj Madavi were present on the occasion.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer/MHADA




N. S. KHOT
मुख्य अधिकारी
मुख्य अधिकारी


मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
-: यांच्या शुभहस्ते :-
मुख्य अधिकारी


मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
म्हाडा
पहिली संगणकीय सोडत- २०२३